Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 2ND JUNE 1898.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख १८ माहे एप्रिल सन १८९८.

नंबर २६२१.—हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) याच्या ९ व्या कलमाअन्वयें दिलेले अधिकार चालवून आणि गव्हर्नर-जनरल इन् कौन्सिल यांची आधीं मंजुरी घेऊन, आलीजाह् गव्हर्नर साहेब बहादूर इन् कौन्सिल यांनीं, बारी पदार्थ मुंबई इलाख्यांत तयार करणें, कबज्यांत ठेवणें व विकणें यांचें नियमन करण्याविषयींच्या ज्या कानू सरकारचा जाहिरनामा नंबर ९१७९, तारीख २६ जुलै सन १८९७ यांत प्रसिद्ध केल्या आहेत, त्यांत खालील मजकूर जास्त दाखल केला आहे :—

१. कानू १७ वी. पारिग्राफ (१), यानंतर खालील मजकूर दाखल करावा ; तो येणेंप्रमाणें :—

"टीप.—ज्या बारीपदार्थांबद्दल लैसेन्स घेण्याकरितां अर्ज करण्याचें काम चालकें असेल, ते बारी पदार्थ सांठवण्याच्या मागझीनाकरितां जागा देण्यासाठीं किंवा मंजूर करण्यासाठीं अगर तसें मागझीन बांधण्याची परवानगी मिळण्यासाठीं स्थानिक सरकाराकडे अगोदरच अर्ज केलेला असल्यास तो तसा केल्याबद्दल, लैसेन्साबद्दलच्या अर्जांत लिहिलें पाहिजे, आणि त्यासंबंधानें कांहीं हुकुम झालेला असल्यास त्याची नकल सोबत ठेविली पाहिजे."

२. कानू १७ वी, पारिग्राफ (२), याच्या (अ) रकमेच्या कंसांतल्या दुसऱ्या भागांच्या शेवटीं "निर्दिष्ट केलेलीं असतील त्यांहून कमी असूं नयेत" ह्या शब्दांनंतर, खालील मजकुर दाखल करावा ; तो येणेंप्रमाणें :—

"सदर्हू प्रकारचें अंतरांचें कोष्टक फर्माविण्यांत येई तोंपर्यंत, मागझीन अगर त्याचा कोणताही भाग आणि इतर इमारती व कामें यांच्या दर्म्यान राखावयाच्या अंतरासंबंधाची अवश्य माहिती, यास जोडलेल्या परिशिष्टांतील ग नमुन्यांत देण्यांत येईल ; हा नमुना अर्जदारानें, मद्रास व मुंबई इलाख्यांतील बारी पदार्थांच्या चीफ इन्स्पेक्टराकडून मिळवावा."

३. सदरील कानूंस जोडलेल्या परिशिष्टापैकीं इ नमुन्यांत, १२ व्या शर्तीनंतर, खालील शर्त नंबर १३ ह्मणून दाखल करावी ; ती येणेंप्रमाणें :—

" १३. सदर्हू मागझीन किंवा त्याचा कोणताही भाग आणि इतर इमारती व कामें यांच्या दर्म्यान राखावयाचीं अंतरें, ह्या लैसेन्सास जोडिलेल्या ह नमुन्यांतील अंतरांच्या * परिशिष्टांत (एकाहून जास्त परिशिष्टें असल्यास तसें लिहावें) दिलेल्या अंतरांइतकीं असावीं."

४. सदर्हू कानूंस जोडिलेल्या परिशिष्टांत, नमुना फ ह्यानंतर, खालील नमुने, ग व ह नमुने ह्मणून दाखल करावे; ते येणेंप्रमाणें :—

## नमुना ग.

(कानू १७ वी पहा.)

**सन १८८४ चा वारी पदार्थांविषयींचा आक्ट.**

नोंदीचा नंबर — नमुना ग.

________________ } ठिकाणीं जें मागझीन स्थापण्याचा विचार आहे त्यापासून
________________ }

खालीं लिहिलेल्या इमारतींपर्यंत व कामांपर्यंत खुलीं † ठेवावयाचीं अंतरें.

| इमारती व कामें. | खुलें ठेवावयाचें कमींत कमी अंतर. | जवाब. | शेरा. |
|---|---|---|---|
| आक्टाच्या ९ व्या कलमाअन्वयें केलेल्या २८ व्या कानूप्रमाणें सदर्हू मागझीनाच्या संबंधानें वापरण्यांत येत असलेली खोली ... ... ... ... | यार्ड. | | |
| आक्टाच्या ९ व्या कलमाअन्वयें केलेल्या २८ अ कानूप्रमाणें सदर्हू मागझीनच्या संबंधानें वापरण्यांत येत असलेलें वर्कशाप. | " | | |
| वाफेनें किंवा इतर शक्तीनें चालविलेली मिनरल किंवा खासगी रेल्वे ... ... ... ... ... | " | | |
| हमरस्ता किंवा सार्वजनिक पायरस्ता ... ... ... | " | | |
| सहल करण्याची जागा (प्रामिनेड) किंवा सर्व लोकांकरितां अगर कोणताही धंदा किंवा काम चालविणाऱ्या लोकांकरिता अड्ड्याची जागा ... ... ... ... ... | " | | |
| कनाल किंवा नाव्य जलाशय ... ... ... | " | | |
| गोदी ... ... ... ... ... | " | | |
| पाणी आंत न येऊं देण्यासाठीं बांधलेला नदीकिनाऱ्याचा किंवा समुद्रकिनाऱ्याचा बांध ... ... ... | " | | |
| पियर किंवा जेटि. ... ... ... ... | " | | |
| तळें (रिझर्व्हॉयर) ... ... ... ... | " | | |
| दुसऱ्या एकाद्या मागझीनसंबंधी, स्टोरसंबंधी किंवा नोंदलेल्या जागेसंबंधी खोली अगर वर्कशाप ... ... ... | " | | |
| इतर कोणतीहि खोली किंवा वर्कशाप किंवा कोणतेंही दुकान. | " | | |

* ह्या अंतरांच्या परिशिष्टाचा नमुना खालीं दिला आहे.

† हीं अंतरें मागझीन पहिल्यानें स्थापण्याच्याच वेळीं नव्हे, परंतु लैसेन्स चालू असतांनाही खुलीं ठेविलीं पाहिजेत.

| इमारती व कामें. | खुलें ठेवावयाचें कमींत कमी अंतर. | जबाब. | शेरा. |
|---|---|---|---|
| दारी पदार्थांचें मागझीन ... ... ... | यार्ड. | | |
| दारी पदार्थांचा स्टोर ... ... ... ... | ,, | | |
| कोणताही बॉयलर, एन्जिन किंवा यंत्र यासाठीं किंवा कोणत्याही कारखान्याच्या कारणासाठीं भट्टी किंवा अग्नि ... ... | ,, | | |
| सार्वजनिक रेल्वे ... ... ... ... | ,, | | |
| राहातें घर, वहिवाटदाराच्या लेखी संमतीनिशीं ... ... | ,, | | |
| राहातें घर, अशा संमतीशिवाय ... ... ... | ,, | | |
| सरकारचा नव्हे असा कारखाना ... ... ... | ,, | | |
| चर्च अगर चापेल ... ... ... ... | ,, | | |
| युनिव्हर्सिटी, कॉलेज अगर शाळा ... ... ... | ,, | | |
| इस्पितळ अगर सार्वजनिक संस्था . ... ... ... | ,, | | |
| टाऊन हॉल किंवा न्यायाचें कोर्ट ... ... ... | ,, | | |
| आच्छादिलेला मार्केट ... ... ... ... | ,, | | |
| नाटकगृह किंवा जेथें लोक जमत असतात अशी इमारत ... | ,, | | |
| सरकारच्या किंवा सरकारतर्फे पब्लिक वर्क्स खात्याच्या ताब्यांत असलेली किंवा म्युनिसिपालिटीच्या ताब्यांत असलेली सार्वजनिक इमारत ... ... ... ... | ,, | | |

टीप.—लैसेन्साकरितां अर्ज करणारानें, आपणास, दुसऱ्या आसनांत नेमून दिलेलीं अंतरें राखतां येतील किंवा नाहीं तें तिसऱ्या आसनांत लिहावें.

जेव्हां नेमिलेलें पुरें अंतर त्याला राखतां येत नसेल, तेव्हां त्यानें आपल्याला किती अंतर राखतां येईल तें लिहून, "शेरा" या कोष्टकांत, याप्रमाणें अंतर कमी करण्यास त्याला ज्या गोष्टी आधारभूत ह्मणून वाटत असतील (ह्मणजे, तें मागझीन उंचवट्यांच्या योगानें किंवा तेथील जमिनीच्या स्वाभाविक स्थितीच्या योगानें किंवा इतर कारणावरून सुरक्षित राहील किंवा कसें) त्या लिहाव्या.

अर्जदाराची सही ——————————

अर्जदाराचा पोस्टाचा पत्ता ——————————

तारीख ——————————

---

नमुना ह.

(नमुना इ याच्या १३ व्या शर्तींत सांगितलेलें अंतरांचें परिशिष्ट.)

सन १८८४ चा दारीपदार्थविषयींचा आक्ट.

नोंदीचा नंबर नमुना ह.

## परिशिष्ट.

मागझीन आणि इतर इमारती व कामें यांच्या दर्म्यान राखावयाचीं अंतरें :—

| खालील दरेक जागेपासून राखावयाचें | कमींत कमी अंतर. |
|---|---|
| आक्टाच्या ९ व्या कलमाअन्वयें केलेल्या २८ व्या कानूप्रमाणें सदर्हू मागझीनच्या संबंधानें वापरण्यांत येत असलेली खोली ... ... ... ... | |
| आक्टाच्या ९ व्या कलमाअन्वयें केलेल्या २८ अ कानूप्रमाणें सदर्हू मागझीनच्या संबंधानें वापरण्यांत येत असलेलें वर्कशाप ... ... ... ... | |
| वाफेनें किंवा इतर शक्तीनें चालविलेली मिनरल किंवा खासगी रेल्वे ... ... | |
| हमरस्ता किंवा सार्वजनिक पायरस्ता ... ... ... ... ... | |
| सहल करण्याची जागा किंवा सर्व लोकांकरितां अगर कोणताही धंदा किंवा काम चालविणाऱ्या लोकांकरितां अड्ड्याची जागा ... ... ... ... | |
| कनाल किंवा नाव्य जलाशय ... ... ... ... ... ... | |
| गोदी ... ... ... ... ... ... ... ... | |
| पाणी आंत न येऊं देण्यासाठीं बांधलेला नदीकिनाऱ्याचा किंवा सद्रमुकिनाऱ्याचा बांध. | |
| पियर किंवा जेटि ... ... ... ... ... ... ... | |
| तळें ( रिझर्व्हायर ) ... ... ... ... ... ... ... | |
| दुसऱ्या एखाद्या मागझीनसंबंधीं, स्टोरसंबंधीं किंवा नोंदलेल्या जागेसंबंधी खोली अगर वर्कशाप... ... ... ... ... ... ... ... | |
| इतर कोणतीहि खोली किंवा वर्कशाप किंवा कोणतेंही दुकान. ... ... ... | |
| वारी पदार्थांचें मागझीन ... ... ... ... ... ... | |
| वारी पदार्थांचा स्टोर ... ... ... ... ... ... ... | |
| कोणताही बॉयलर, एन्जिन किंवा यंत्र यासाठीं किंवा कोणत्याही कारखान्याच्या कारणासाठीं भट्टी किंवा अग्नि. ... ... ... ... ... | |
| सार्वजनिक रेल्वे ... ... ... ... ... ... ... | |
| राहातें घर, वहिवाटदाराच्या लेखी संमतीनिशीं: ... ... ... ... | |
| राहातें घर, अशा संमतीशिवाय ... ... ... ... ... ... | |
| सरकारचा नव्हे असा कारखाना... ... ... ... ... ... | |
| चर्च अगर चापेल ... ... ... ... ... ... ... | |
| युनिव्हर्सिटी, कॉलेज अगर शाळा ... ... ... ... ... | |
| इस्पितळ अगर सार्वजनिक संस्था... ... ... ... ... ... | |
| टाउन हॉल किंवा न्यायाचें कोर्ट... ... ... ... ... ... | |
| आच्छादिलेला मार्केट ... ... ... ... ... ... | |
| नाटकगृह किंवा जेथें लोक जमत असतात अशी इमारत ... ... ... | |
| सरकारच्या किंवा सरकारतर्फे पब्लिक वर्क्स खात्याच्या ताब्यांत असलेली किंवा म्युनिसिपालिटीच्या ताब्यांत असलेली सार्वजनिक इमारत ... ... ... | |

मात्र इतकेंच कीं, वर लिहिलेल्या कोणत्याही इमारतीला किंवा इतर कामाला जमिनीच्या स्वाभाविक स्थितीच्या योगानें किंवा मातीच्या तयार केलेल्या चांगल्या व पुरेशा उंचवट्यांच्या योगानें सदर्हू मागझीनपासून जर अशा रीतीनें अडोसा होत असेल कीं, त्या मागझीनच्या कोणत्याही भागापासून ती इमारत किंवा इतर काम दिसत नाहीं, तर, अशी इमारत व इतर काम आणि तें मागझीन यांच्या दरम्यान जें अंतर राखावें ह्मणून सदरीं ठरविलें आहे, तें अर्ध्यानें कमी करण्याचा अधिकार आहे.

आणखी असेंही ठरविलें आहे कीं, वर लिहिलेल्या कोणत्याही इमारतीला किंवा इतर कामाला, दरम्यानच्या एकाद्या टेंकडीच्या योगानें सदर्हू मागझीनपासून जर अशा रीतीनें अडोसा होत असेल कीं, त्या इमारतीच्या किंवा कामाच्या कोणत्याही भागापासून त्या मागझीनच्या कोणत्याही भागापर्यंत काढलेली रेषा त्या टेंकडींतून जावी, तर अशी इमारत व इतर काम आणि तें मागझीन यांच्या दरम्यान जें अंतर राखावयाचें ह्मणून ह्या परिशिष्टांत ठरविलें आहे, तें तीन-चतुर्थांशांनीं कमी करण्याचा अधिकार आहे; मात्र, एकाद्या सरकारी इन्स्पेक्टराकडून जर असें लेखी जाहीर करण्यांत आलें कीं त्याच्या मतें, ज्या दरम्यानच्या टेंकडीच्या संबंधानें अंतर कमी करण्याबद्दल मागणी करण्यांत येत आहे ती टेंकडी तें अंतर तसें कमी करणें योग्य होईल अशा तऱ्हेची नाहीं, तर, सदर्हू प्रकारें अंतर कमी करण्याबद्दल अधिकार देणारा हा विशेष ठराव त्या इमारतीच्या किंवा कामाच्या बाबतींत लागू नाहीं असें समजावें.

सदर्हू मागझीन आणि ह्या परिशिष्टांत निर्दिष्ट केलेल्या इमारती व कामें ह्यांच्या दरम्यान राखावयाचीं अंतरें, सदर्हू परिशिष्टांत दाखल केल्याप्रमाणें असतील; आणि हें लैसेन्स दिल्यानंतर कोणत्याही वेळीं जर, अशा कोणत्याही इमारती किंवा कामें हीं जवळ आल्याकारणानें, त्या परिशिष्टांत दाखल केलेल्या अंतरांबाहेर तें मागझीन राहिलें नाहीं तर, त्या मागझीनचा बारीपदार्थ ठेवण्याच्या कामीं उपयोग करण्याचा अधिकार ह्या लैसेन्सावरून चालू राहिलेला नाहीं असें समजावें.

टिपा.—(अ) कोणत्याही कारखान्याच्या आंत असलेल्या इमारती व मागझीनें यांच्या दरम्यान, परस्परांमध्यें, परिशिष्टाच्या पहिल्या (वर्कशापबाबदच्या) ओळींत निर्दिष्ट केलेलीं अंतरें राखलीं पाहिजेत. हा नियम एकाच कारखान्यांत नसलेल्या, एकाच वहिवाटदाराच्या मालकीच्या दोन किंवा अधिक मागझीनांस, किंवा अनेक वहिवाटदारांच्या प्रसंगीं त्यांच्या परस्पर संमतीनें तशा मागझीनांस, लागू होईल.

(ब) डिटोनेटर हे मागझीनजवळच्या एका उपगृहांत खालील शर्तींवर ठेवितां येतील:—

(१) दर १,००० डिटोनेटरांना कमींत कमी २½ रत्तल बारीपदार्थ ह्या मानानें हिशोब करतां, डिटोनेटरमधला बारीपदार्थ १०० रत्तलांहून जास्त असूं नये. (ह्या मानाप्रमाणें ह्मटलें ह्मणजे, "सहापट" शक्तीचे सरासरी ४४,००० डिटोनेटर होतात; याहून जास्त शक्तीचे डिटोनेटर असले तर, अर्थात, त्यांची संख्या कमी होईल.)

(२) डिटोनेटरांकरितां उपगृह अशा रीतीनें बांधलें असलें पाहिजे कीं, त्यांतले कोणतेही डिटोनेटर व मागझीनचा अंतर्भाग यांच्या दर्म्यान निदान २ फूट चुन्याचें बांधकाम व ३ फूट हवेकरितां जागा राहावी.

आलीजाह नेक नामदार गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

(सही) जे. मॉन्टीथ,
चीफ् सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

## सन १८७२ चा हिंदुस्थानचा करारांविषयीं आक्ट सुधारण्याबद्दलच्या आक्टाचा मसुदा.

ज्याअर्थी गैरवाजवी दाबासंबंधाच्या कायद्याची व्याख्या जास्त चांगल्या रीतीनें करून सन १८७२ चा हिंदुस्थानचा करारांविषयीं आक्ट सुधारणें योग्य आहे, त्याअर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

१. (१) ह्या आक्टास सन १८७२ चा हिंदुस्थानचा करारांविषयीं आक्ट सुधारण्याकरितां सन १८९८ चा आक्ट असें ह्मणावें. लहान सरनामा, सुरवात आणि लागू होणें.

(२) तो तारीख माहे सन १८९८ रोजीं अमलांत येईल, आणि

(३) ह्या आक्टाच्या सुरवातीनंतर ज्या कोणत्याही कराराच्या संबंधानें दावा करण्यांत येईल, त्या प्रत्येक करारास हा आक्ट लागू होईल.

२. सन १८७२ चा हिंदुस्थानचा करारांविषयीं आक्ट ह्याचें १६ वें कलम ह्याअन्वयें रद्द करण्यांत येऊन त्याच्या बदला खालील कलम दाखल केलें आहे, तें येणेंप्रमाणें:— सन १८७२ चा आक्ट ९ वा ह्याच्या १६ व्या कलमाच्या बदला नवीन कलम दाखल करणें.

"१६. (१) जेव्हां करार करणाऱ्या पक्षकारांनीं तो करार बरोबरीच्या नात्यानें केलेला नसून त्यांपैकीं एक पक्षकार दुसऱ्या पक्षकारावर वर्चस्व चालविण्यासारख्या स्थितींत असेल, आणि त्यानें त्या आपल्या स्थितीचा उपयोग त्या दुसऱ्या पक्षकाराविरुद्ध गैरवाजवी फायदा करून घेण्यासाठीं किंवा ज्या शर्ती त्यानें एऱ्हवीं कबूल केल्या नसत्या त्या शर्ती त्याकडून कबूल करविण्यासाठीं केलेला असेल, तेव्हां तो करार 'गैरवाजवी दाबाच्या' योगानें करून घेतला आहे असें म्हणावें. "गैरवाजवी दाब" याची व्याख्या.

(२) विशेषेंकरून, आणि वर घालून दिलेल्या नियमाच्या सामान्य व्याप्तीस बाध न येतां, खालीं लिहिलेल्या बाबतींत एक मनुष्य दुसऱ्यावर वर्चस्व चालविण्यासारख्या स्थितींत आहे असें समजलें पाहिजे: ह्मणजे—

(अ) तो मनुष्य त्या दुसऱ्या मनुष्यावर खरा किंवा दर्शनी अधिकार चालवीत असेल किंवा त्या पक्षकारांचें विश्वासाचें नातें असेल त्या बाबतींत, अगर

(ब) त्यानें, जो मनुष्य स्वभावतःच मनानें दुर्बल आहे किंवा ज्याची मानसिक शक्ति वार्धक्यामुळें, रोगामुळें, मनाच्या किंवा शरीरसंबंधी व्यथेमुळें किंवा इतर विशेष कारणामुळें कांहीं काळपर्यंत किंवा कायमची दूषित झालेली आहे अशा मनुष्यावरोबर करार केलेला असेल त्या बाबतींत,

(३) दुसऱ्या मनुष्यावर वर्चस्व चालविण्यासारख्या स्थितींत असलेला कोणताही मनुष्य त्याबरोबर करार करील तेव्हां, तो करार योग्य व वाजवी असल्याबद्दल आणि गैरवाजवी दाबाच्या योगानें करून न घेतल्याबद्दल पुरावा करण्याचा बोजा त्या मनुष्यावर राहील.

### उदाहरणें.

(अ) अ हा आपला मुलगा ब ह्याला, तो अल्पवयी असतांना कांहीं पैसा देतो आणि ब वयांत आल्यावर त्याकडून आपल्या पितृत्वाच्या दाबाचा गैरउपयोग करून, त्या दिलेल्या पैशाबद्दल यावयाच्या रकमेपेक्षा जास्त रकमेचें खत लिहून घेतो. अ नें गैरवाजवी दाबाचा उपयोग केला.

(ब) अ, जो रोगानें किंवा वार्धक्यामुळें अशक्त झालेला आहे आणि ज्याचा वैद्यकीय उपचारक ब हा आहे त्याकडून तो उपचारक, आपल्या त्या संबंधाच्या दाबाचा उपयोग करून, आपल्या धंद्यासंबंधाच्या केलेल्या नोकरीबद्दल अयोग्य रकम आपल्यास देण्याचें कबूल करण्यास मन वळवितो. व गैरवाजवी दाबाचा उपयोग करितो.

( क ) अ हा एक शेतकरी, आपल्या गांवाचा किंवा तो ज्या कुटुंबांतला किंवा जातींतला असेल त्या कुटुंबाचा किंवा जातीचा सावकार ब ह्याकडून पैशाची कांहीं रकम कर्जी काढून तिच्याबद्दल खत लिहून देतो. पुराव्यावरून असें दिसून येतें कीं, हा व्यवहार करतेवेळीं अ हा फारच कर्जबाजारी होता किंवा त्याच्या पूर्वीं त्याची अगर त्याच्या कुटुंबापैकीं कांहीं माणसांची ब बरोबर पैशासंबंधी कांहीं देवघेव होती, आणि यामुळें त्याला दुसऱ्या कोणत्याही सावकाराकडे जाणें किंवा बाजारांत पैसा कर्जी काढणें अवघड पडलें: झालेला व्यवहार योग्य व वाजवी आहे आणि गैरवाजवी दाबाच्या योगानें करून घेतलेला नाहीं असें शाबीत करणें ब कडे आहे."

सन १८७२ चा आक्ट ९ वा, कलम १९, यांची सुधारणा व त्यानंतर एक नवीन कलम दाखल करणें.

३. सदरहू आक्टाच्या १९ व्या कलमांतील "गैरवाजवी दाब" हे शब्द याअन्वयें रद्द केले आहेत, आणि त्याच कलमानंतर खालील कलम ह्याअन्वयें दाखल केलें आहे: तें येणेंप्रमाणें :—

गैरवाजवी दाबाच्या योगानें करविलेला करार रद्द करण्यास कोर्टास अधिकार.

"१९. अ. जेव्हां कोणताही करार गैरवाजवी दाबाच्या योगानें करविलेला असेल, तेव्हां तो पूर्णपणें किंवा कोर्टास योग्य वाटतील त्या शर्तींनिशीं व अटींनिशीं रद्द करण्याचा अधिकार आहे.

## उदाहरणें.

(अ) अ चा मुलगा एका प्रामिसरी नोटीवर ब च्या नांवाची खोटी सही करितो. ब हा, अ च्या मुलावर फिर्याद करण्याच्या धमकीनें अ कडून त्या खोट्या केलेल्या नोटीच्या रकमेबद्दल खत लिहून घेतो. जर ब ने खतावरून दावा केला तर कोर्टाला तें खत रद्द करितां येईल.

(च) अ हा एक सावकार ब ह्या शेतकऱ्यास १०० रु. देतो, आणि गैरवाजवी दाबाच्या योगानें दरमहा दर शेंकडा १२ टक्क्यांच्या व्याजानें २०० रुपयांचें खत लिहून देण्यास त्याचें मन वळवितो. कोर्टाला तें खत रद्द करण्याचा अधिकार आहे; परंतु, आपल्यास योग्य वाटेल त्या व्याजाच्या दरानें ते १०० रुपये परत देण्याबद्दल ब ला हुकुम करण्याचा कोर्टाला आधिकार आहे.

सन १८७ चा आक्ट ९ वा याच्या ७४ व्या कलमाची सुधारणा.

४. (१) सदर्हू आक्टाच्या ७४ व्या कलमापैकीं पहिला पारिग्राफ यावरून रद्द करून त्याच्या ऐवजीं खालील पारिग्राफ दाखल केला आहे; तो येणेंप्रमाणें:—

दंड देण्याची शर्त दाखल केली असेल तेव्हां करार मोडल्याबद्दल द्यावयाचा मोबदला.

"७४. जेव्हां एखादा करार मोडला असेल, आणि तो करार मोडला असतां अमुक रकम द्यावी असें त्यांत सांगितलें असेल अगर त्या करारांत दंडादाखल इतर कोणतीही शर्त दाखल केलेली असेल, तर, तो करार मोडल्याबद्दल जो पक्षकार फिर्याद करीत असेल त्याला, तो करार ज्या पक्षकारानें मोडला असेल त्याकडून, नुकसानीचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे; परंतु ह्याप्रमाणें मिळावयाचा मोबदला सदर्हू करारांत सांगितलेल्या रकमेपेक्षां किंवा जो दंड देण्याची शर्त दाखल केली असेल त्या दंडापेक्षां जास्त असूं नये. मग तो करार मोडल्यामुळें खरोखर खराबी अगर तोटा झाल्याविषयीं शाबीत झालें असो अगर नसो."

( २ ) सदर्हू कलमास जोडलेल्या ( क ) उदाहरणानंतर खालील उदाहरणें जास्त दाखल करावीं: तीं येणेंप्रमाणें:—

"( ड ) अ हा ब याला, दर शेंकडा १२ टक्क्यांच्या व्याजानें सहा महिन्यांच्या अखेरीस १,००० रुपये परत देण्याविषयीं एक खत लिहून देतो, तें अशा शर्तीवर कीं, तसें करण्यांत कसूर झाल्यास ती कसूर झाल्याच्या तारखेपासून दर शेंकडा ७५ टक्के प्रमाणें व्याज चालू होईल. ही शर्त दंडादाखल असून ब याला अ कडून, कोर्टास वाजवी वाटेल तेवढा मात्र नुकसानीचा मोबदला मिळण्याचा हक्क आहे.

(इ) अ यानें ब सावकारास कांहीं पैसा देणें आहे आणि तो, तें कर्ज फेडण्यासाठीं, दहा मण धान्य एका विवक्षित तारखेस त्यास देण्याचें कबूल करतो; आणि, अशी शर्त कबूल करितो कीं, तें धान्य त्या ठरलेल्या तारखेपर्यंत दिलें नाहीं तर आपण वीसमण धान्य देण्यास पात्र होऊं. ही शर्त दंडादाखल असून, करार मोडण्यांत आला तर नुकसानीचा वाजवी मोबदला मात्र मिळण्याचा ब स हक्क आहे.

(फ) अ हा ब ला, १,००० रुपयांची एक रकम सारख्या पांच माही हप्त्यांनीं परत देण्याचें कबूल करतो, तें अशा शर्तीवर कीं कोणताही एक हप्ता दिला नाहीं तर सगळी रकम येणें होईल. ही शर्त दंडादाखल नसून, करार त्याच्या अटींप्रमाणें अमलांत आणतां येईल."

---

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

ज्या प्रसंगीं करार करण्याची संमति राजीखुषीनें दिलेली असून पक्षकार बरोबरीच्या नात्यानें करार करीत असतील त्या प्रसंगीं करार करण्याच्या स्वातंत्र्यास धका लावण्याचा ह्या आक्टाचा उद्देश नसून, ज्या विवक्षित अन्याय्य करारांच्या संबंधानें कोर्टांचे अधिकार हल्लीं अयोग्य रीतीनें नियंत्रित केलेले आहेत असें दिसतें त्या करारांचा निकाल लावण्यास त्यांना हल्लींपेक्षां जास्त अखत्यार द्यावा असा ह्या आक्टाचा इरादा आहे.

### कलमांवर टिप्पणें.

कलम १ ( ३ ).—यापूर्वीं केलेला कोणताही करार योजिलेल्या आक्टावरूनच बेकायदेशीर ठरावयाचा नाहीं; मात्र त्यावरून कोर्टास न्यायसंबंधी जास्त अधिकार मिळावयाचा आहे; त्या अर्थीं, जे दावे तो आक्ट सुरू झाल्यानंतर करण्यांत येतील, ते दावे ज्या करारांविषयीं असतील ते करार तो आक्ट अमलांत यावयाच्या आधीं केलेले असले तरी, त्या सर्व दाव्यांस तो आक्ट लागू करावा हें योग्य दिसतें.

कलम २.—पक्षकार बरोबरीच्या नात्यानें करार करीत नसल्याकारणानें संमति राजीखुशीची नसते हा मुद्दा आधारभूत धरून हल्लीं अमलांत असलेले गैरवाजवी दाबासंबंधाचे कानू तयार केलेले आहेत; परंतु सन १८७२ चा हिंदुस्थानचा करारांविषयीं आक्ट याच्या १६ ज्या कलमांत "गैरवाजवी दाब" याची जी व्याख्या आहे, तींत गैरवाजवी दाबाचे दोन साधारण मात्र प्रकार सांगितलेले असून त्यांचें आधारभूत तत्त्व त्यांत सांगितलेलें नाहीं. त्या कलमांत गैरवाजवी दाबाचे जे विशेष प्रकार सांगितले आहेत तेवढेच राहूं न देतां त्यासंबंधाच्या कायद्यास जें सामान्य तत्त्व आधारभूत आहे, तें त्या आक्टांत दाखल करावें हा पोट कलम ( १ ) याचा उद्देश आहे.

जो मनुष्य दुसऱ्यावर गैरवाजवी दाब चालविण्यासारख्या स्थितींत असेल त्यानें त्या स्थितीचा उपयोग खरोखर केला असेल अगर नसेल, हें उघड आहे. परंतु जेथें पक्षकारांनीं बरोबरीच्या नात्यानें करार केलेला नसेल, तेथें, जो पक्षकार दुसऱ्यावर वर्चस्व चालविण्यासारख्या स्थितींत असेल त्यानें आपल्या त्या स्थितीचा फायदा करून घेतला नाहीं असें दाखविण्याचा बोजा त्यावर टाकला पाहिजे हें बरोबर दिसतें. पोट कलम ( ३ ) ह्याचा उद्देश हाच असून त्यावरून कोर्टाला, कराराच्या शब्दार्थाचा विचार न करितां एकंदर व्यवहार खरोखर वाजवी होता किंवा नव्हता यावद्दल चौकशी करितां येईल.

कलम ३.— गैरवाजवी दाब खरोखर चालविण्यांत आला असल्यावद्दल कोर्टास आढळून येईल त्या बाबतींत त्याला त्या पक्षकारांच्या दरम्यान न्याय करितां यावा म्हणून पुष्कळ गोष्टी त्याच्या नजरेवर ठेविल्या पाहिजेत. जर करार दोन पक्षकारांपैकीं कोणत्याच पक्षकाराकडून अमलांत आलेला नसला, तर तो कोर्टानें पूर्णपणें रद्द केला म्हणजे बस

आहे; परंतु जेथें करार एका किंवा दोन्ही पक्षकारांनीं अंशतः अमलांत आणिलेला असेल, तेथें तो करार नुसता रद्द केल्यानें त्या दोन्ही पक्षकारांस मूळ स्थितींत आणून ठेवितां यावयाचें नाहीं हें उघड आहे. ह्मणून, अशा प्रसंगीं पूर्ण न्याय करितां यावा यासाठीं, कोर्टाला, शर्ती व अटी घालून देण्याचे अधिकार देणें जरूर आहे. सन १८७२ चा हिंदुस्थानच्या करारांविषयींचा आक्ट यांत १९ अ ह्मणून जें एक नवीन कलम दाखल करण्याचें योजिलेलें आहे, त्याचा उद्देश हाच आहे.

कलम ४.— करारांतील अनिश्चित रकमेच्या दंडाबद्दलचें कलम आणि निश्चित रकमेच्या नुकसानीच्या मोबदल्याबद्दल ज्यांत शर्त आहे अशीं कलमें, यांच्या दरम्यान इंग्लंडच्या कायद्यांत जो सूक्ष्म पारिभाषिक भेद आहे तो दूर करण्यासाठीं सन १८७२ च्या हिंदुस्थानच्या करारांविषयींच्या आक्टाचें ७४ वें कलम योजिलेलें दिसतें; परंतु त्या कलमाखालीं कोणकोणत्या गोष्टी येतात याबद्दल, त्या कलमांत वापरलेल्या भाषेमुळें, कोर्टांनीं परस्पर भिन्न असे अभिप्राय दिले आहेत. सदर्हू कलमाअन्वयें कोर्टांना जे न्यायसंबंधी अधिकार देण्याचें योजिलेलें आहे, त्या अधिकारांचा व्यापक अर्थ करावा हें इष्ट असल्यावरून त्या कलमाची भाषा अशा रीतीनें विस्तृत केली आहे कीं, त्याच्या शब्दार्थाप्रमाणें, तें कलम, दंडादाखल सर्व शर्तींस, ( मग तो दंड कोणत्याही विवक्षित रकमेच्या रूपानें असो अगर नसो ) लागू होईल.

तारीख १९ मार्च सन १८९८. (सही.) जे. वुडबर्न.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.